**ध्वनी प्रदूषणास आळा घालण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन कटिबद्ध**

मुंबई, १० मे २०१८:- ध्वनी प्रदूषणास आळा घालण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) सर्व उपाययोजना राबविण्यात येत असल्याचे व्यवस्थापकीय संचालक, श्रीमती अश्विनी भिडे यांनी सांगितले. मंत्रालयात नुकत्याच झालेल्या बैठकीत त्यांनी ही माहिती दिली. यावेळी मेट्रो ३ मार्गासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांची सखोल माहिती देण्यात आली.

मंत्रालयात झालेल्या बैठकीला गृह (वाहतूक) विभागाचे प्रधान सचिव श्री. मनोज सौनिक, मुं.मे.रे.कॉच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे, संचालक (प्रकल्प) श्री. एस.के.गुप्ता, कार्यकारी संचालक (नियोजन) श्री.आर.रमणा व आवाज फौंडेशनच्या श्रीमती सुमैरा अब्दुलाली आदी उपस्थित होते.

बैठकीत कफ परेड व विधान भवन स्थानकांच्या बांधकामाच्या ठिकाणी ध्वनी प्रतिबंधक लावल्याचे तसेच पायलिंग दरम्यान होणाऱ्या आवाजास प्रतिबंध लावण्यासाठी अंमलात आणलेल्या उपाययोजनेविषयी देखील माहिती दिली. बांधकाम ठिकाणांची परिस्थिती लक्षात घेता जेथे-जेथे शक्य होईल तेथे अतिरिक्त ध्वनी प्रतिबंधक उपाययोजना अवलंबिल्या जाणार असल्याचेही यावेळी मुं.मे.रे.कॉ.कडून स्पष्ट करण्यात आले.

पायलिंगच्या कामाने अधिक प्रमाणात ध्वनी निर्माण होतो मात्र हे काम डिसेंबर २०१८ अखेरीस पूर्ण होणार आहे. तसेच या कालावधीत स्थानकाचे बांधकाम जमीन पातळीच्या 10 ते 12 मीटर खाली पोहचलेले असेल. जास्तीत जास्त ठिकाणी डेकिंग व पायलिंगचे काम पूर्ण देखील होणार असल्याने मेट्रोच्या कामामुळे होणारा आवाज कमी होणार आहे, असे श्रीमती भिडे यांनी स्पष्ट केले. 2016-17 मध्ये मेट्रो चे काम सुरू होण्यापूर्वी मेट्रो कॉर्पोरेशन द्वारे करण्यात आलेल्या बेसलाईन सर्वे मध्ये सुद्धा निर्धारित ध्वनी मर्यादेचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले होते, असेही त्या म्हणाल्या. त्यामुळे

विविध शासकीय यंत्रणांनी एकत्र येऊन ध्वनी प्रदूषणाची पातळी कमी करण्यासंदर्भात ठोस पावले उचलणे गरजेचे असल्याबाबत ही चर्चा झाली. तसेच मेट्रो-३ सारख्या जागतिक दर्जाचा शासकीय प्रकल्प राबविताना ध्वनी प्रदूषणावर प्रतिबंध लावण्यासाठी दर्जेदार तंत्रज्ञान व पद्धतींचा वापर केला गेल्यास भविष्यात या पद्धती 'एक रोल मॉडेल' म्हणून शासकिय तसेच खाजगी बांधकाम प्रकल्पांना लागू करण्यासही उपयुक्त ठरतील असेही सांगण्यात आले.

श्रीमती सुमैरा अब्दूलाली यांनी आपण मेट्रो -३ प्रकल्पाच्या विरोधात नसल्याचे स्पष्ट केले. त्या म्हणाल्या मुं.मे.रे.कॉ मार्फत राबविल्या जाणाऱ्या ध्वनी प्रतिबंध उपाययोजनाविषयी व ध्वनिवप्रदूषणाची पातळी शक्य तेव्हढी खाली आणण्याकरिता त्या आग्रही आहेत. प्रधान सचिव, गृह (वाहतूक) श्री सौनिक यांनी मुं.मे.रे.कॉ.ला सर्व बांधकाम स्थळावर ध्वनी प्रतिबंध उपाययोजना अवलंबविण्याच्या सूचना करत प्रकल्पावर काम करणाऱ्या सर्व कंत्राटदार व कामगारांना ध्वनी प्रदूषणामुळे होणाऱ्या दुष्परिणामाविषयी जागृती निर्माण करण्याचे निर्देश दिले. प्रकल्पाविषयी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी तसेच काही सूचना असल्यास कळविण्या संदर्भात मुं.मे.रे.कॉने श्रीमती अब्दूलाली यांना विनंती केली.

मेट्रो-३ प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर वाहतूक कोंडीमुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणास आळा बसणार असून वायू प्रदूषण देखील कमी होणार आहे तेव्हा मुंबईकरांनी प्रकल्पाच्या अंमलबजावणी दरम्यान सहकार्य करावे, असे आवाहन मुं.मे.रे.कॉ तर्फे करण्यात आले आहे.